पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट दिनांक - ०७/०७/२०२३

**पोलीस उपआयुक्त कार्यालय परिमंडळ - ५ पुणे शहर**

# परिमंडळ ०५ कार्यक्षेत्रांतील पोलीस स्टेशन कडील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हे उघडकीस आणून केलेले कामगिरीबाबत

पुणे शहर शहरांतील परिमंडळ -५ चे कार्यक्षेत्रांत होणाऱ्या जबरी चोरी,वाहन चोरी व घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेकामी परिमंडळीय पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना अशा पध्दतीचे गुन्हे घडलेले ठिकाणाचा व अशा प्रकारे गुन्हे करणारे सराईत गुन्हेगार यांचा अभ्यास करुन त्यांचा शोध घेणे व गुन्हे उघडकीस आणणेकामी सुचनां दिलेल्यां होत्या. त्याप्रमाणे हडपसर,कोंढवा,मुंढवा,लोणी काळभोर,वानवडी पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी सराईत गुन्हेगारांना जेरबंद करुन तपास करुन खालीलप्रमाणे जबरी चोरी,वाहन चोरी व दिवसा/ रात्रौ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे :-

पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतील परिमंडळ- ५ चे कार्यक्षेत्रांतील हडपसर,कोंढवा,मुंढवा,लोणी काळभोर,वानवडी पोलीस स्टेशन व परिमंडळ ४ चे कार्यक्षेत्रांतील विमानतळ,येरवडा पोलीस स्टेशनकडील असे सर्व मिळून एकूण जबरी चोरी १२ गुन्हे,दिवसा/रात्रौ घरफोडी ०६ गुन्हे व वाहन चोरी ०९ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.वरील गुन्हयांतील चोरीस गेलेला मुद्येमाल सोन्याचे दागदागिने व मोटार सायकली असा मिळून एकूण किं.रु.१३,७३,८२०/- रुपयांचा हस्तगत करणेत आलेला आहे.

सदर कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर, श्री.रंजन कुमार शर्मा, मा.पोलीस उप- आयुक्त, परिमंडळ-०५ पुणे शहर श्री.विक्रांत देशमुख, यांचे मार्गदर्शनाखाली व सुचनांप्रमाणे परिमंडळ-५ चे विभागीय मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,पुणे शहर श्री.शाहुराजे साळवे व मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,पुणे शहर श्रीमती अश्विनी राख यांनी व त्यांचे विभागीय पो.स्टे.कडील प्रभारी अधिकारी व पोलीस निरिक्षक (गुन्हे) व तपास पथकांतील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी राबविलेले असून गुन्हेगारांवर कारवाई केलेली आहे.